# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.04.2025** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताची कठोर पावलं; पाकिस्तानबरोबरचा सिंधू जल करार केला स्थगित,
- वाघा-अटारी सीमा बंद; पाकिस्तानी नागरिकांना भारताचा व्हिसा देण्यावरही बंदी
- पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक

आणि

- पंतप्रधानांच्या हस्ते आज बिहारमध्ये विविध विकास कामांचं उद्घाटन आणि लोकार्पण

**पहलगाम-सुरक्षा समिति निर्णय**

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कडक धोरण अवलंबलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी काल झालेल्या सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितिच्या अर्थात सी सी एस च्या बैठकीत एकंदर सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यात आला तसंच सर्व सैन्यदलांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर काही महत्वाचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. या निर्णयांनुसार भारत आणि पाकिस्तानदरम्यान असलेला, 1960 चा सिंधू पाणी करार तत्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत हा निर्णय लागू राहील. वाघा-अटारी सीमा बंद करण्यात आली असून, अटारी इथली एकात्मिक तपासणी चौकी अर्थात आय सी पी तात्काळ प्रभावाने बंद करण्यात आली आहे. 1 मे 2025 पर्यंत वैध प्रवास परवानगी असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना या मार्गाने पाकिस्तानात परतण्याची परवानगी देण्यात आली आहे. या अंतिम मुदतीनंतर, भारत आणि पाकिस्तानमधील जमिनीवरील प्रवास पूर्णपणे स्थगित करण्यात येणार आहे.

बैठकीत आणखी एक कठोर निर्णय घेण्यात आला, त्यानुसार, पाकिस्तानी नागरिकांसाठी सार्क व्हिसा सवलत योजना रद्द करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकांना सार्क सवलत योजना अर्थात SVES अंतर्गत यापुढे भारतात प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही; तसंच पाकिस्तानी नागरिकांना पूर्वी जारी करण्यात आलेले सर्व प्रकारचे SVES व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. तसंच, सध्या या व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी तत्काळ प्रभावाने 48 तासांची मुदत देण्यात आली आहे.

राजनैतिक स्तरावर नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण सल्लागारांना आठवडाभरात भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचबरोबर, भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून स्वतःचे

संरक्षण, नौदल आणि हवाई सल्लागार मायदेशी परत बोलवण्याची घोषणा केली आहे. दोन्ही उच्चायुक्तांलयामधून या सेवा सल्लागारांच्या पाच सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही काढून घेतले जाईल.
भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालय आणि नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील एकूण कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही दूतावासांमधील कर्मचाऱ्यांची संख्या सध्याच्या 55 वरून 30 पर्यंत कमी केली जाईल. ही कपात 1 मे 2025 पासून लागू केली जाईल.

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंजाब राज्याने आपली पाकिस्तानच्या बाजूची सीमा बंद केली असून राज्यात अतिदक्षतेचे आदेश जारी करण्यात आले आहेत. तसंच पंजाबमधल्या पर्यटन स्थळांवरची सुरक्षा व्यवस्था देखील कडक करण्यात आली आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी काल प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. राज्याच्या सीमा पाकिस्तानला आणि काश्मीरला लागून असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज नवी दिल्लीत सर्व पक्षीय बैठक बोलावली आहे.

**बैठक राजनाथ**

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी काल तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन काश्मीर खोऱ्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. या हल्ल्यातील दोषींना सोडणार नाही, त्यांना कठोर शासन केलं जाईल, इतकंच नव्हे तर पडद्यामागच्या सूत्रधारांनाही सोडणार नाही, असं राजनाथ सिंह यांनी बैठकीनंतर प्रसार माध्यमांना सांगितलं.

**शहा पहलगाम**

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल पहलगाम इथं घटनास्थळाची पाहणी केली. या ठिकाणी झालेल्या हल्ल्यात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये नौदल अधिकाऱ्यासह दोन परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. शहा यांनी काल मृतांना श्रद्धांजली अर्पण केली तसंच मृतांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

**कॉंग्रेस पहलगाम**

कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी या दहशतवादी हल्ल्यासंदर्भात गृहमंत्री अमित शहा यांच्याशी काल चर्चा केली. दहशतवादविरोधी लढाईत कॉंग्रेस पक्ष केंद्र सरकारच्या पूर्ण पाठीशी असल्याचं त्यांनी सांगितलं. दहशतवाद्यांना कडक शासन झालं पाहिजे, असं खरगे यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे, तर या हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबांना न्याय मिळायला हवा, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**यूएन-पहलगाम**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. कोणत्याही परिस्थितीत नगरिकांवरील हल्ले निषेधार्ह आणि अस्वीकार्य आहेत असं त्यांनी आपल्या शोकसंदेशांत म्हंटलं आहे. गुटेरेस यांनी हल्ल्यातील मृतांप्रति आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

**नायडू- विमान कंपन्या**

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी विमान कंपन्यांबरोबर तातडीची बैठक घेतली. विमान कंपन्यांना नियमित भाडे पातळी राखण्याचे तसंच हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह त्यांच्या मूळ राज्यात पोहोचवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश नायडू यांनी विमान कंपन्यांना दिले.

**पार्थिव-अंत्यसंस्कार**

जम्मू काश्मीरमधल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या महाराष्ट्रातल्या सहा पर्यटकांच्या कुटुंबांना राज्य शासनानं प्रत्येकी पाच लाख रुपये मदत जाहीर केली आहे. जम्मू काश्मीर राज्य प्रशासनानंही या हल्ल्यातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपये तर गंभीररीत्या जखमी झालेल्यांना प्रत्येकी २ लाख रुपये मदत जाहीर केली आहे. दरम्यान पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांवर काल रात्री डोंबिवलीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तिघांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं.

पुण्याचे कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे तसंच नवी मुंबईचे दिलीप दिसले या पर्यटकांचाही या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे यांचं पार्थिव शरीर आज पहाटे पुण्यात आणण्यात आलं असून त्यांच्या पार्थिव देहांवर आज सकाळी अंत्यसंस्कार होणार आहेत.  पनवेलमधील दिलीप दिसले यांच्या पार्थिव देहावर काल पनवेल मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**पंतप्रधान-बिहार दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहारला भेट देणार असून, मधुबनी इथे राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या  कार्यक्रमात ते सहभागी होतील. या प्रसंगी, 13 हजार 480 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि  पायाभरणी पंतप्रधानच्या हस्ते होणार असून, रेल्वे आणि वीज क्षेत्रातील काही प्रकल्पाचं लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे. यात, जयनगर ते पाटणा दरम्यान धावणाऱ्या नमो भारत रॅपिड रेल्वे आणि सहरसा ते लोकमान्य टिळक टर्मिनस दरम्यान धावणाऱ्या अमृत भारत एक्सप्रेसला दूरस्थ माध्यमातून हिरवा झेंडा दाखवतील.

**स्टीलपंप्र**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मुंबईतल्या बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये इंडिया स्टील 2025 या सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय स्टील प्रदर्शनाचं दूरस्थ माध्यमातून उद्घाटन होणार आहे. तीन दिवसांच्या या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत जागतिक पोलाद  मूल्य साखळीतील आघाडीचे देश एकत्र येऊन, भविष्यातील वाटचालीवर चर्चा करणार आहेत.  या परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह  छत्तीसगड आणि ओडिशाचे मुख्यमंत्री सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

**अभिमत विद्यापीठ**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं पुण्यातल्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफ.टी.आय.आय. आणि कोलकत्यातल्या सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान केला आहे. या संदर्भातली अधिसूचना शिक्षण मंत्रालयानं काल जारी केली.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने सनरायझर्स हैदराबादचा सात गडी राखून पराभव केला. हैदराबादानं दिलेले 144 धावांचं लक्ष्य मुंबई संघानं पंधरा षटकं आणि चार चेंडूतच गाठलं. ट्रेन्ट बोल्टनं मुंबई संघासाठी चार गडी बाद केले त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने कालच्या सामन्यादरम्यान पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहिली. तसंच खेळाडू, समालोचक आणि इतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदवला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**